Est Sept 1994

2(f) & 12 (B): March 2006

Hanuman Shikshan Prasarak Mandal, Sonpeth's
LATE RAMESH WARPUDKAR ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, SONPETH, DIST. PARBHANI 431516 (MS)
NAAC Accredited with Grade- B
(Affiliated to: Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)
Ph. (02453) 240 142 Fax. (02453)240 142 Principal: 09423 779 000
Web: www.warpudkarcollege.com Email:lrwcsnpt@rediffmail.com/shreyavasant2010@gmail.com

Shri. P.R. Kadam
President

Dr. V.D. Satpute
Principal

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

## Departmental Activity Report

- Name of the Department: Cultural.

1. Name of the Activity: Late Rajabhau Kadam state level elocution competition
2. Date: 24-Jan-2024
3. Place & Time: L.R.W college Sonpeth
4. Objectives of the Programme: explain the importance of elocution competion.
   2) state the benefits of environment.
5. Guests/Resource Persons: Hon. Rameshwarji kadam saheb prof. Hanuman Hargule, Sambhaji Rodge.
6. Abstract of the Programme: Late Rajabhau kadam state level elocution competion was conducted by cultural Dept on 24/10/2024
7. Total Beneficiaries: 148.
8. Achievements/ Outcomes: student learned the importance of elocution competion

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ सोनपेठ संचलित

# कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी

## सांस्कृतिक विभाग

### शैक्षणिक वर्ष : २०२३-२०२४

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

| भाग – अ | | |
|---|---|---|
| उपक्रम / कार्यक्रमाचे क्रमांक | | ०६ |
| उपक्रम / कार्यक्रमाचेनाव | | कै.राजाभाऊ कदम राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा. |
| दिनांक- | | २४ जानेवारी २०२४ |
| उपक्रम / कार्यक्रमाचे स्वरूप | | कै राजाभाऊ कदम यांच्या प्रतिमेचे पुजन व विविध विषयावर वक्तृत्व स्पर्धा. |
| उद्देश | १ | वक्तृत्व स्पर्धेचे स्वरुप मुलांच्या लक्षात येईल.. |
| | २ | वक्तृत्व व भाषण यातील फरक मुलांना कळेल. |
| | ३ | समकालीन भारतापुढील अव्हाने कोणकोणती आहेत हे कळेल. |
| | ४ | सोशल मिडीयाच्या जाळयात अडकेलेला तरुण. सोशल मिडीयाचे फायदे तोटे लक्षात येतील. |
| | ५ | पर्यावरणाचे फायदे लक्षात येतील.. |
| प्रमुख पाहुणे / मार्गदर्शक/ व्याख्याते | | श्री रामेश्वर कदम, प्रा. हनुमान हरगुळे, प्रसिद्ध कवी संभाजी रोडगे, प्रचार्य डॉ सातपुते, प्रा एम. बी. पाटील. |
| उद्घाटक | | श्री रामेश्वर कदम साहेब, संचालक हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ, सोनपेठ. |
| ठिकाण | | कै. दादाराव कदम सांस्कृतिक सभागृह. कै रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ. |
| उपस्थिती | विद्यार्थी | १०८ |
| | कर्मचारी | २० |
| | इतर | २० |
| | एकूण | १४८ |

भाग – ब

उपक्रम / संक्षिप्त विवरण

सांस्कृतिक विभागाच्या वतीने कै दादाराव कदम सांस्कृतिक सभागृह,रमेश् वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ येथे कै राजाभाऊ कदम राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा २०२४ संपन्न झाली .या स्पर्धेचे उद्घाटन हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक मा रामेश्वर कदम साहेब यांनी केले. परीक्षक प्रा. हनुमान हरगुळे, प्रसिद्ध कवि संभाजी रोडगे, प्रसिद्ध वक्ते प्रशांत शिंगाडे, हे होते. यावेळी प्राचार्य डॉ. सातपुते व्ही.डी., अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ पाटील एम. बी., ग्रंथपाल डॉ. अनंत सरकाळे व सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ काळे बी. एम. हे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै राजाभाउ कदम ,यांच्या प्रतिमेचे पुजन व दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सरुवात झाली. सुरवातीला सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ काळे बी.एम. यांनी प्रस्ताविक केले. परीक्षक प्रशांत शिंगाडे यांनी वक्तृत्व स्पर्धेचे नियम सांगितले. या नंतर स्पर्धेला सुरुवात झाली. सर्व स्पर्धकाला ०७ मिनिटे दिले होते. या ०७ मिनिटात त्यांना निवडलेल्या विषयावर आपले विचार मांडायचे होते. या स्पर्धेसाठी १) समकालीन भारतापुढील आव्हाने २) सोशल मिडियात गुरुफटलेली आजची तरुणाई ३) पर्यावरण संवर्धनात युवकांची भुमिका या विषयावर स्पर्धेतील विद्यार्थ्यांना आपले मते मांडायची होती. या तिनी विषयावर मुलांनी जोरकसपणे आपली मते मांडली. धर्माधता, जातीयता, बेरोजगारी, दहशतवाद, गरीबी , लोकसंख्यावाढ, स्त्रीयांवरील अत्याचार, लोकशाही बचाव, या सारखी अनेक अव्हाने असल्याचे सांगितले. सोशल मिडियाच्या दोनी बाजू विद्यार्थ्यांनी मांडल्या. सोशल मिडियांच्या जमेच्या बाजू मांडून त्याचे तोटे पण मुलांनी सांगितले. पर्यावरण संवर्धनाचे महत्व अनेक मुलांनी सांगितले. या स्पर्धेत १४ मुलांनी सहभाग नोंदवला.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक पाटील यश रविंद्र बी. के बिर्ला महाविद्यालय मुंबई, दिवत्तीय खरात स्वप्नील सोपान माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय संभाजी नगर यांने तर उत्तेजनार्थ मोहिते आकाश दत्तात्रय न्यु आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज अहमदनगर, बेद्रे कुणाल रामेश्वर श्री शिवाजी महाविद्यालय परभणी, मोहिनी चंद्रशेखर पायघन श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव यांनी पटकावला.

यावेळी प्रमुख वक्ते व परीक्षक प्रा. हनुमान हरगुळे यांनी मार्गदर्शन करतांना सर्व विदयार्थ्यांनी सर्व विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण विचार मांडल्याचे नमूद करुन आपण सर्वांनी वाचनावर भर दयावा असे सांगितले.सोशल मिडीयातील विचार घेताना ते मूळ पुस्तकातुन घ्यावेत असेही सुचवले. सहशिक्षक,श्री संभाजी हरिभाऊ यांनी वक्तृत्व ही कला असून ती अभ्यासातून साध्य करता येते असे ते म्हणाले. त्यासाठी वाचन, चिंतन, मनन यांची गरज असल्यांचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय समारोपात डॉ सातपुते यांनी स्पर्धेचे महत्व प्रकट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.कदम एस बी. यांनी केले. या स्पर्धेचा आस्वाद १४८ जणांनी घेतला.

उपयुक्तता.

१ विद्यार्थ्यांतिल वक्तृत्व कला गुणाचा विकास होईल..
२ विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व संपन्न होईल.
३ देशापुढील अव्हाने मुलांच्या लक्षात येतील.
४ समाजाचे आरोग्य निरोगी ठेवण्यात ही स्पर्धा उपयुक्त ठरेल.
५ सोशल मिडियाचा वापर मुल काळजीपूर्वक करतील.
६ राष्टप्रेम वाढीस लागेल.
७ पर्यावरणासंबधी मुलांमध्ये जागृती निर्माण होईल.

भाग – क

उपक्रम / कार्यक्रमाचे खर्चाचे विवरण

| अ क्र | खर्च करण्यात आलेल्या वस्तूचे विवरण | झालेला खर्च (रु) | शेरा |
|---|---|---|---|
| | हार व पुष्पगुच्छ<br>सामोसे व चहापाणी | २००<br>१५०० | |
| एकूण खर्च | | १७०० | |

अहवाल सादर करणाऱ्या समिती / विभाग- Cultural Department.

| पद | नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| समिती अध्यक्ष/ विभाग प्रमुख | डॉ. काळे बी.एम.. | [signature] |
| समन्वयक | डॉ. कदम एस.बी. | [signature] |
| सदस्य | | |

टीप: सोबत कार्यक्रमाचे GEO TAGGED फोटो व वर्तमानपत्रातील बातम्या जोडाव्यात

Co-ordinator
IQAC
LRWC, Sonpeth

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth